


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३०४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१५ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पंढरपूर जवळ भीषण अपघात : पिकअप विहिरीत कोसळून ०८ भाविकांचा मृत्यू

## रांजणी गावावर शोककळा ६ जणांना वाचवण्यात यश

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१४, पंढरपूर (सोलापूर) :** पंढरपूर तालुक्यात म्हसवड-पंढरपूर मार्गावर तांदूळवाडी गावाजवळ एका विहिरीत पिकअप वाहन कोसळून भीषण अपघात झाला आहे. या दुर्घटनेत ०८ जणांचा बुडून मृत्यू झाला असून सर्व मृत पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावचे रहिवासी आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रांजणी गावातील भाविक म्हसवड येथील सिद्धनाथाच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून गावाकडे परत येत असताना माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी गावानजीक चालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकअप वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीत कोसळले.

ही विहीर पाण्याने तुडुंब भरलेली होती आणि तिला कोणतेही संरक्षक कठडे नव्हते. त्यामुळे पिकअप थेट पाण्यात गेले. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या विहिरीजवळ यापूर्वी कधीही अपघात झाला नव्हता. हा पहिलाच अपघात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. स्थानिकांच्या मदतीने ६ जणांना वाचविण्यात यश आले आहे. पोलीस, अग्निशामक दल, प्रांताधिकारी व जिल्हा प्रशासनाची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. क्रेनच्या सहाय्याने आधी पिकअप जीप बाहेर काढली जाणार आहे, त्यानंतर विहिरीत उतरून मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत ८ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.



या दुर्घटनेतील मृतांमध्ये ३ लहान मुलांचा आणि ५ महिलांचा समावेश आहे. सर्वच भाविक प्रवाशांचा मृत्यू झाल्याने रांजणी गावावर शोककळा पसरली आहे. विहिरीभोवती लोकांनी मोठी गर्दी केली असून सर्वजण मदतकार्यात व्यस्त आहेत. अपघाताचे कारण अस्पष्ट अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस व प्रशासनाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. मृतांची ओळख पटविण्याचे व अन्य प्रवाशांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करीत आहेत. या दुर्घटनेमुळे रांजणी गावासह संपूर्ण पंढरपूर तालुक्यावर शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेवर मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

**मुख्यमंत्री काय म्हणाले?**

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी येथे एक वाहन खाजगी शेतातील विहिरीत पडल्याने झालेल्या अपघातात काही भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. सुदैवाने ६ जणांचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. त्यांच्यावर उपचार केले जात आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक दोघेही तातडीने घटनास्थळी रवाना झाले आहेत आणि स्थानिक प्रशासनाशी आम्ही सातत्याने संपर्कात आहोत. या घटनेतील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकारकडून देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. दरम्यान, या घटनेनंतर संबंधित विहीर बांधण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांनी परवानगी दिली होती आणि इतर सर्व दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली जात आहे.

# कल्याण एसटी स्थानक स्थलांतरामुळे प्रवाशांचे अतोनात हाल

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, कल्याण(ठाणे) :** कल्याण : कल्याण रेल्वे स्थानक परिसरात सुरू असलेल्या 'स्मार्ट सिटी' प्रकल्प आणि उड्डाणपूल बांधकामामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. त्यातच मुख्य एसटी आगाराचे तात्पुरते स्थलांतर विठ्ठलवाडी येथे करण्यात आल्याने बाहेरगावाहून येणाऱ्या हजारो प्रवाशांना गेल्या सहा महिन्यांपासून मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

कल्याण पश्चिमेकडे जाणाऱ्या प्रवाशांना आता थेट एसटी आगारात उतरता येत नसून अनेक बसगाड्या पत्रीपूल, नेतिवली नाका किंवा सूचक नाका परिसरातच प्रवाशांना उतरवत आहेत. परिणामी सामानासह प्रवास करणाऱ्या नागरिकांना अतिरिक्त ताणासह अधिकचा खर्च सहन करावा लागत आहे.

एसटी बसमधून अर्ध्या रस्त्यात उतरवल्यानंतर प्रवाशांना कल्याण रेल्वे स्थानक किंवा शहरातील अन्य भागात पोहोचण्यासाठी रिक्षाचा आधार घ्यावा लागतो. यासाठी १०० ते १५० रुपये भाडे आकारले जात असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे. विशेषतः कोकण, अहिल्यानगर, बीड, उस्मानाबाद आणि इतर दूरवरच्या भागांतून येणाऱ्या प्रवाशांकडे मोठ्या प्रमाणात सामान असते. अशा वेळी अर्ध्या रस्त्यात उतरावे लागल्याने त्यांची मोठी गैरसोय होत



आहे.

कल्याण स्टेशन परिसरात सुरू असलेले हे काम २०२१ पासून सुरू आहे.वास्तविक गेले पाच वर्ष सुरू असलेले हे काम अद्याप देखील पूर्णत्वास गेलेल नाही.

कल्याण स्टेशन परिसरातील 'सॅटीस' आणि परिसर विकास प्रकल्पाचे काम २०२१ पासून सुरू आहे. याच प्रकल्पाअंतर्गत एसटी आगाराचे आधुनिकीकरण आणि बहुमजली इमारतीचे बांधकाम सुरू आहे. मात्र, पाच वर्षे उलटूनही प्रकल्प अद्याप पूर्ण झालेला नाही.

अहिल्यानगर, बीड, धाराशिव, कोकण आणि अन्य भागांतून येणाऱ्या एसटी बसला सध्या कल्याण डेपोमध्ये प्रवेश दिला जात नाही. या बसगाड्या गोविंदवाडी किंवा पत्रीपूल मार्गे थेट विठ्ठलवाडी आगारात पाठवल्या जातात. यामुळे कल्याण पश्चिमेकडे जाणाऱ्या प्रवाशांना मधल्या मार्गात उतरावे लागते आणि त्यानंतर खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते.

दरम्यान कल्याण आगार व्यवस्थापक चेतन देवधर यांनी सांगितले की, कल्याण आगाराचे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. प्रशासनाने डिसेंबर २०२६ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य दिले असून त्यानंतर प्रवाशांना पुन्हा कल्याण आगारातूनच सेवा उपलब्ध होईल. तोपर्यंत मात्र हजारो एसटी प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागणार असल्याचे चित्र सध्या तरी काही दिवस दिसणार आहे.

कल्याणातील एसटी डेपो आणि आगाराचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा देखील सुरू आहे. प्रशासनाकडून डिसेंबर २०२६ ची मुदत देण्यात आली आहे. तोपर्यंत हे काम पूर्ण झाले, तर प्रवाशांचे हाल कमी होतील असे चेतन देवधर,कल्याण आगार व्यवस्थापक यांनी सांगितले.

अलिबागहून येणाऱ्या बस देखील सूचक नाक्यावर किंवा डोंबिवली मार्गे आल्या तर पत्रीपुलावर प्रवाशांना उतरवून तिथून कल्याण पश्चिमेकडे जाण्यासाठी रिक्षाचालक थेट १०० रुपयांची मागणी करतात. अर्ध्या रस्त्यात उन्हातान्हात होणाऱ्या हालाचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा अशा प्रकारच्या संतापजनक प्रतिक्रिया आता एसटी प्रवाश्यांमधून उमटू लागल्या आहेत.

# अवैध 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल' साठ्यावर धाड; १.२० कोटींचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, ठाणे :** अंबरनाथ तालुक्यात उसाटणे परिसरात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'च्या मोठ्या साठ्यावर राज्य दक्षता पथकाने रविवारी धडक कारवाई करत सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात संबंधित आरोपींविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अवैध इंधन साठवणूक आणि काळाबाजार विरोधातील ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे.

नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे (भा.प्र.से.) यांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे राज्य दक्षता पथकाने अंबरनाथ येथील उसाटणे भागातील न्यूओ लॉजिस्टिक पार्क परिसरात, राज्यस्तरीय प्लॉट क्रमांक २० समोर छापा टाकला. कारवाई दरम्यान टँकरचे सील तोडून 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल' ची बेकायदेशीर साठवणूक व देवाणघेवाण सुरू असल्याचे उघडकीस आले. दोन व्यक्ती या प्रकारात प्रत्यक्ष सहभागी असल्याचे आढळून आले.

पथकाने घटनास्थळी तपासणी केली असता जीजे-१२/ बीवाय-७५६० क्रमांकाचा टँकर पूर्णपणे भरलेला



आढळला. या टँकरमध्ये सुमारे २९ हजार ७०० किलो मिक्स हायड्रोकार्बन ऑईल असल्याचे निदर्शनास आले. तसेच एमएच-४३/ ई-१९० क्रमांकाचा आणखी एक टँकर घटनास्थळी उभा असून त्यामध्ये इलेक्ट्रिक मोटारीच्या सहाय्याने इंधन साठवण्याचे काम सुरू असल्याचे आढळले.

याशिवाय एमएच-४६/ सी-१२८२ क्रमांकाच्या टेम्पोमध्ये २०० लिटर क्षमतेच्या प्लास्टिक बॅरलमध्ये तेलाची बेकायदेशीर साठवणूक सुरू होती. या वाहनात २२० लिटर क्षमतेचे २० रिकामे प्लास्टिक बॅरल्स देखील आढळून आले. घटनास्थळी जमिनीवर आणखी ८० रिकामे बॅरल्स, एक इलेक्ट्रिक मोटार आणि एक एअर ऑपरेटेड डायाफ्राम (एओडी) पंप जप्त करण्यात आला.

या सर्व साहित्य, वाहने आणि इंधनासह एकूण सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संबंधितांकडे आवश्यक परवाने किंवा वैध कागदपत्रे नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून, संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच अवैध इंधन साठवणूक, वाहतूक आणि काळाबाजाराशी संबंधित इतर बाबींचाही तपास केला जाणार आहे. ही कारवाई नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य दक्षता पथकाचे सहायक नियंत्रक शिधावाटप प्रदीप काळे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी योगेश जंगले, मुख्य निरीक्षण अधिकारी नागनाथ हंगरगे तसेच शिधावाटप निरीक्षक रामराजे भोसले, चंद्रकांत कांबळे, विकास नागदिवे, रवींद्र राठोड, राजेश सोरते, देवानंद थोरवे, पवन कुंभले, राहुल इंगळे आणि अरुण काते यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# तुकाराम मुंढेंच्या कारवाईची धास्ती ज्यूस, आईस्क्रीमच्या दुकानांचं शटर डाऊन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, जालना :** राज्यातील प्रशासनात सध्या चर्चेचा मुद्दा असलेले आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सूत्रे हाती घेतल्यानं राज्यात अन्नातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून सुरू करण्यात आलेल्या कठोर कारवाईचा परिणाम आता जालना शहरासह ग्रामीण भागातही दिसून येऊ लागला आहे. परिसरातील अनेक ज्यूस सेंटर, आईस्क्रीम पार्लर, शीतपेय विक्री केंद्रे तसेच काही खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी गेल्या काही दिवसांपासून आपली दुकाने तात्पुरती बंद ठेवल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत असून बाजारपेठेत विविध चर्चांना उधाण आलं आहे.

**व्यापाऱ्यांमध्येही धास्तीचे वातावरण**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थांवर कारवाईची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी पाठविणे, विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर राजूर परिसरातील व्यापाऱ्यांमध्येही धास्तीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

उन्हाळ्याच्या हंगामात ज्यूस, आईस्क्रीम आणि थंड पेयांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. या काळात ग्राहकांची संख्या वाढलेली असते. मात्र, गेल्या आठवड्याभरापासून अनेक दुकाने बंद असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. काही व्यापाऱ्यांनी संभाव्य तपासणीच्या भीतीने आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी तात्पुरती दुकाने बंद ठेवल्याची चर्चा बाजारपेठेत सुरू आहे.

**कच्च्या मालाचा वापर :** स्थानिक नागरिकांच्या मते, सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अन्नातील भेसळ रोखणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा कमी दर्जाच्या कच्च्या मालाचा वापर, अस्वच्छ वातावरणात तयार होणारे खाद्यपदार्थ, कालबाह्य वस्तूंची विक्री किंवा निकृष्ट दर्जाच्या बर्फाचा वापर यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने सुरू केलेल्या कारवाईचे अनेकांनी स्वागत केले आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाकडून सर्व खाद्य व्यवसायिकांना आवश्यक परवाने घेणे, स्वच्छतेचे नियम पाळणे, दर्जेदार कच्चा माल वापरणे आणि अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या (एफएसएसएआय) नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे वारंवार सांगितले जात आहे. नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांना कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसल्याचेही प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात येत आहे.

**नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचे**

काही व्यापाऱ्यांनी मात्र प्रशासनाच्या वाढत्या कारवाईमुळे व्यवसायिकांमध्ये चिंता निर्माण झाल्याचे सांगितलं. तपासणीदरम्यान कोणतीही त्रुटी आढळू नये यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि परवान्यांची पूर्तता केली जात असल्याचं त्यांनी नमूद केलं. जिल्ह्यात ज्यूस, आईस्क्रीम आणि शीतपेय विक्री केंद्रे तात्पुरती बंद राहण्यामागे तुकाराम मुंढेंच्या संभाव्य तपासणीची भीती हे प्रमुख कारण असल्याची चर्चा रंगत आहे.

## संपादकीय

### जसपाल राणा



भारताचे सर्वोत्कृष्ट पिस्तूल नेमबाज आणि आणि पॅरिस ऑलिम्पिक मध्ये मनू भाकरला दोन पदके मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणारे प्रशिक्षक जसपाल राणा यांचे शुक्रवारी हृदय विकाराच्या झटक्याने अकस्मात निधन झाले त्यांच्या निधनाने क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे. जसपाल राणा हे अवघ्या ४९ वर्षांचे होते. हे वय जाण्याचे नव्हतेच म्हणूनच त्यांचे निधन सर्वांना चटका लावून जाणारे ठरले. भारतातीलच नाही तर जगातील सर्वोत्कृष्ट नेमबाजांपैकी एक असणाऱ्या जसपाल राणा यांचा जन्म २८ जून १९७६ रोजी उत्तरकाशी येथे झाला. जसपाल राणा यांचे वडील नारायण सिंह राणा यांनी १९७१ च्या युद्धात इंडो तिबेटियन बॉर्डर पोलिसमध्ये सेवा बजावली होती आणि नंतर ते उत्तराखंडचे पहिले क्रीडामंत्री बनले. जसपाल राणा यांना लहानपणापासूनच नेमबाजीची आवड होती. त्यांच्या वडिलांनीच त्यांना नेमबाजीतील बाळकडू पाजले. त्यांचे वडील हेच त्यांचे नेमबाजीतील पहिले गुरू होते. वयाच्या १२ व्या वर्षीच त्यांनी नेमबाजीतील राष्ट्रीय स्तरावरील पहिले सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर त्यांनी देशांतर्गत स्पर्धेत पदकांचा धडाका सुरू केला. जसपाल राणा यांनी आपल्या कारकिर्दीत ६०० हून अधिक पदके जिंकले. १९९४ साली राष्ट्रकुल आणि आशियाई स्पर्धेत त्यांनी भारताच्या नेमबाजी संघाचे नेतृत्व केले. या दोन्ही महत्वाच्या आणि मोठ्या स्पर्धेत त्यांनी २५ मिटर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. २००६ सालच्या दोहा आशियाई क्रीडा स्पर्धेत यांनी तत्कालीन विश्वविक्रमाची बरोबरी करत तीन सुवर्णपदक व एक रौप्य पदक मिळविले होते. जसपाल राणा यांनी राष्ट्रकुल स्पर्धेत चारवेळा सहभाग घेतला आणि ९ सुवर्णपदकांसह १५ पदके मिळवली. ते राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताचे सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू आहेत. राष्ट्रकुल असो की आशियाई क्रीडा स्पर्धा जसपाल राणा यांचे सुवर्णपदक निश्चित असायचे मात्र दुर्दैवाने त्यांना ऑलिम्पिकचे पदक मिळवता आले नाही. आपण जरी ऑलिम्पिक पदक मिळवू शकलो नाही तर देशासाठी ऑलिम्पिक पदक मिळवणारे खेळाडू निर्माण करण्याचे त्यांनी ठरवले आणि निवृत्ती नंतर खेळाडूंना नेमबाजीचे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. २०१२ सालापासून ज्युनिअर पिस्तूल प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या जसपाल राणा यांनी सौरभ चौधरी, अनिश भानवाला आणि चिंकी यादव यासारख्या तरुण नेमबाजांना घडवलं. जसपाल राणा यांच्या कठोर प्रशिक्षण आणि मार्गदर्शनामुळे मनू भाकरने २०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये दोन कसंस्यादक जिंकले.

प्रशिक्षक म्हणून हे त्यांचे सर्वात मोठे यश होते. खेळातील त्यांच्या अफाट योगदानाची आणि नेमबाजांच्या पुढील पिढीला घडवण्यात बजावलेल्या भूमिकेची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना २०२० साली प्रतिष्ठित द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या अचानक जाण्याने खेळाडूंना मोठा धक्का बसला आहे. मनू भाकरने ही बातमी ऐकताच आपला सामना थांबवला आणि पिस्तूल खाली टाकत जमिनीवर बसून रडू लागली. जसपाल राणा यांच्या निधनाने त्यांच्या शिष्यांचेच नाही तर संपूर्ण क्रीडा विश्वाचे मोठे नुकसान झाले आहे. एक खेळाडू आणि मार्गदर्शक म्हणून त्यांनी तरुण प्रतिभावंत खेळाडू घडवून क्रीडा विश्वात अतुल्य योगदान दिले. त्यांचे योगदान येणाऱ्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा देणारे ठरेल. जसपाल राणा यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

– श्याम ठाणेदार

# वृद्धांचा सन्मान : अत्याचारमुक्त समाजाची गरज

१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई–वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.

वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.

शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो.

आर्थिक अत्याचार हा आजच्या काळात वृद्धांवरील अत्याचाराचा अत्यंत गंभीर प्रकार ठरत आहे. वृद्ध व्यक्तींच्या संपत्तीवर बळजबरीने ताबा मिळविणे, त्यांच्या पेन्शन किंवा बचतीचा गैरवापर करणे, फसवणूक करून कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे किंवा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक वृद्ध व्यक्ती आर्थिकदृष्ट्या आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा भावनिक कारणांमुळे अशा अत्याचाराविरोधात आवाज उठवत नाहीत.

दुर्लक्ष हा वृद्ध अत्याचाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. वृद्ध व्यक्तींना वेळेवर अन्न न देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी न घेणे, औषधोपचार टाळणे किंवा त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना कुटुंबामध्ये पूर्णपणे एकटे पाडले जाते, त्यांच्याशी संवाद साधला जात नाही किंवा त्यांना ओझे समजले जाते. हे दुर्लक्षही अत्याचाराचेच एक रूप आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते.

वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव



आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते.

अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कंटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात.

वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.

भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यापैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणामार्फत आर्थिक सहाय्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते.

कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक आहे. पिढ्यांमधील संवाद वाढविणारे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीला वृद्धांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेता येईल. माध्यमांनीही वृद्धांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत सकारात्मक जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे.

डिजिटल युगात वृद्ध व्यक्तींना तंत्रज्ञानाची माहिती करून देणेही महत्त्वाचे ठरते. ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर राहणाऱ्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे आणि सामाजिक संबंध टिकवून ठेवणे शक्य होते.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे. आजचे वृद्ध हे कालचे समाजनिर्माते, कुटुंबाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक आहेत. त्यांच्या कष्टामुळे आणि त्यागामुळे अनेक पिढ्या घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे कितपत लक्ष देतो आणि त्यांना कितपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे.

समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.

१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल.

आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे 'वृद्धांचा आदर – अत्याचाराला नकार' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## ए आय

शोधलावले आत्मघाती
आणले तंत्रज्ञान एआय
तंत्रज्ञ आधुनिकहिटलर
चालेल माणसा शिवाय

रे फक्त नाही म्हणायचे
उपलब्ध हजारो पर्याय
कायम विद्यार्थी व्हायचे
शिक्षणाकुठला न उपाय

करा मान्य कमी पॅकेज
खालीपाणी वरती साय
मनाने केली आत्महत्या
गळ्याला आवळून टाय

उगाचं कर्जाऊ घरगाडी
नाचे राक्षसी ई एमआय
भागघ्यायचे शर्यतीमध्ये
गहाण ठेवी आम्ही पाय

अ शाश्वत उच्चनोक–यां
बा आज हाय उद्या नाय
एकचं मेल स्क्रीन वरती
करुनि टाकतो बायबाय

स्तर असो कुठलाही तो
भरोशाचा कुणीही नाय
देश परदेश एक सारखे
यु एस वाला जॉब खाय

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज

# 'संस्कृत' विषय सक्तीचा करावा !

केंद्रीय विद्यालय संघटनेने त्रिभाषा सूत्रांतर्गत येत्या शैक्षणिक वर्षापासून सर्व शाळांमध्ये इयत्ता सहावी आणि नववीच्या वर्गासाठी संस्कृत विषयाची किमान एक तुकडी ठेवणे अनिवार्य केले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या या संस्थेने २९ मे रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार सर्व शाळांना विद्यार्थी आणि पालकांकडून तिसऱ्या भाषेचा पर्याय घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले आहे.

या तिसऱ्या भाषेत संस्कृत किंवा इतर कोणतीही प्रादेशिक किंवा राज्याची भाषा निवडता येईल. बदली होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुलांची सोय व्हावी म्हणून प्रत्येक शाळेत संस्कृतची किमान एक तुकडी असणे गरजेचे असेल. विद्यार्थ्यांच्या संख्येवर शाळेतील तुकड्यांची संख्या ठरणार आहे. भारतवर्षाची मूळ भाषा संस्कृत आज दुर्मिळ होत चालली आहे, तर परकीय भाषा इंग्रजी आज देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे, याला भारताचे दुर्दैव नाही, तर काय म्हणावे ? संस्कृत ही सर्वांत प्राचीन भाषा असून भारतीय संस्कृतीची नाळ ज्या प्राचीन वेद उपनिषिदांमध्ये, महाकाव्यांमध्ये दडली आहे ते सर्वच संस्कृत भाषेत आहेत. संस्कृत ही भारताची मूळ भाषा असल्याने तिचे संवर्धन करण्याची गरज असताना तिला आज जाणीवपूर्वक डावलले जात आहे. आजमितीला इंग्रजी माध्यम आणि कॉन्व्हेंट शाळांचे स्तोम भारतात सर्वत्र माजले आहे. मराठी माध्यमांतही पहिली पासून इंग्रजी सक्तीची करण्यात आली आहे. तर दुसरीकडे संस्कृतला पर्यायी भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. ही पर्यायी भाषा सुद्धा फारच कमी शाळा–महाविद्यालयांमध्ये शिकवली जाते. त्यामुळे संस्कृत भाषा शिकण्याची आवड असूनही शाळा महाविद्यालयांत ती शिकवणे व्यवस्थापनाच्या धोरणात नसल्याने विद्यार्थ्यांना नाईलाजास्तव अन्य उपलब्ध भाषा शिकाव्या लागतात. अनेक महाविद्यालयांत तर फ्रेंच, जर्मन, डच यांसारख्या परकीय भाषा शिकवल्या जातात; मात्र संस्कृत शिकवण्यासाठी शिक्षक भरती केले जात नाहीत. आज अनेक शाळांमध्ये शाळा भरताना सुरुवातीला संस्कृत भाषेतील श्लोक आणि प्रार्थना घेतल्या जातात; मात्र विद्यार्थ्यांना त्यांचा नीटसा अर्थच कळात नसल्याने ते म्हणताना केवळ पाठांतर केल्याप्रमाणे म्हटले जाते. इंटरनेटच्या मुक्त वापरामुळे आणि इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावामुळे पाश्चिमात्य संस्कृतीची छाप आज भारतीयांवर मोठ्या प्रमाणात जाणवते. भारतीय संस्कृतीला तिचे पुनर्वैभव प्राप्त करून द्यायचे असेल, तर किमान इयत्ता पाचवीपासून सर्व माध्यमांच्या शाळांतून संस्कृत विषय सक्तीचा करण्यात यावा !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नगरपालिका सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण करा - भास्कर शिंदे

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१४, माथेरान :** माथेरान नगरपरिषदेत नव्याने सत्ता स्थापन होऊन ५ महिन्यांचा कालावधी उलटला असला तरी अद्याप सर्वसाधारण सभा झालेली नाही. त्यामुळे शहरातील विविध विकासकामे, नागरिकांच्या समस्या, पर्यटन विकासाशी संबंधित प्रश्न तसेच प्रलंबित विषयांवर चर्चा होण्यास विलंब झाला आहे. दरम्यान सोमवार, दि.१५ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण (लाईव्ह) करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांमधून पुढे येत आहे. गेल्या ३ वर्षांहून अधिक काळ नगरपरिषदेत प्रशासकीय राजवट होती. या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांच्या दर्जाबाबत तसेच खर्च करण्यात आलेल्या निधीबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही विकास कामे अपूर्ण असतानाही संबंधित ठेकेदारांना देयके अदा केल्याच्या चर्चांमुळे नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. त्यामुळे या विषयांवर सभागृहात होणारी चर्चा जनतेपर्यंत थेट पोहोचावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नागरिकांच्या मते, सर्वसाधारण सभा ही जनतेच्या हिताशी निगडित निर्णय घेणारे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. शहराच्या विकासासाठी कोणते निर्णय घेतले जात आहेत, विविध प्रभागांतील समस्या कशा मांडल्या जात आहेत आणि त्यावर काय उपाययोजना सुचविल्या जात आहेत, याची माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम १९६५ मधील कलम ८१(२) नुसार नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा सार्वजनिक स्वरूपाची असते. कोणत्याही नागरिकाला सभेला उपस्थित राहण्याचा अधिकार असल्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सभेचे थेट प्रक्षेपण केल्यास प्रशासनातील पारदर्शकता अधिक वाढेल, असे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

नगरपरिषदेच्या सभांचे थेट प्रक्षेपण हे पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासनाचे प्रतीक आहे. शहराच्या विकाससंदर्भातील निर्णयांची माहिती नागरिकांना थेट मिळाली पाहिजे. तसेच लोकप्रतिनिधी आपल्या प्रभागातील प्रश्न सभागृहात कशा पद्धतीने मांडतात, हे मतदारांना पाहण्याची संधी मिळणे ही लोकशाहीसाठी सकारात्मक बाब ठरेल. असे मत भास्करराव शिंदे यांनी मांडले.

## राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कर्जत तालुक्यात 'महाआरोग्य शिबिर' संपन्न



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.१४, कर्जत (रायगड) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कर्जत तालुक्यातील बेकरेवाडी येथे 'महाआरोग्य शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. अं.पोलीस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया (नवी दिल्ली) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या संयुक्त विद्यमानाने हे शिबिर उत्साहात संपन्न झाले. या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेचे अध्यक्ष जितेंद्र पाटील आणि पोलीस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरात रुग्णांची मोफत बीपी, शुगर, कोलेस्ट्रॉल, रक्ताच्या विविध चाचण्या, ईसीजी आणि डोळे तपासणी करण्यात आली. तसेच गरजू रुग्णांना मोफत औषध वाटपही करण्यात आले. आरोग्य शिबिरासोबतच येथे रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. वाढदिवसाचे औचित्य साधून केवळ आरोग्यच नव्हे तर पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जितेंद्र पाटील म्हणाले की, सध्या वाढत असलेल्या कडक उन्हाचा विचार करता, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रत्येकाने वृक्षलागवडीसाठी आणि त्यांच्या संवर्धनासाठी विशेष भर दिला पाहिजे.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ.दिव्या, डॉ.मयुरी मोहिते, समाधान पाटील आणि त्यांच्या सर्व स्टाफनर्सचे विशेष वैद्यकीय सहकार्य लाभले. याप्रसंगी मनसे नेते जितेंद्र पाटील, किशोर शितोळे यांच्यासह राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. विशाल बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रदेश संघटक विजय मोहिते, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जैतू कराळे, तसेच बेकरेवाडीतील ग्रामस्थ नामदेव निरगुडा, रमेश पारधी, गजानन पारधी, बुधाजी पारधी, जयेंद्र निरगुडा, राजेश निरगुडा यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापौर, नगरसेवक, मनपा आयुक्त, अधिकारी करणार विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्याच दिवशी स्वागत

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासातील महत्वाचा क्षण असून हे क्षण संस्मरणीय व्हावे. यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाने शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाची जय्यत तयारी केली आहे. या निमित्ताने महापौरांसह सर्व पदाधिकारी, नगरसेवक तसेच महापालिका आयुक्तांसह सर्व अधिकारी विविध शाळांमधील प्रवेशोत्सव समारंभप्रसंगी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत.नवी मुंबई महानगरपालिकेच्या ५७ प्राथमिक आणि २३ माध्यमिक अशा ८० शाळांमध्ये सोमवार, दि.१५ जून पासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात येणार आहे. शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरावा यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष 'शाळा प्रवेशोत्सव' निमित्त विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, फुले आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत केले जाणार आहे. प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात पालकांचा सहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश आहे. या निमित्ताने महापालिकेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे.शाळांमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अत्यंत महत्वाचा असल्याचे लक्षात घेत विशेष स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले असून शाळा परिसर आकर्षकरित्या सजविण्यात येत आहे. काही शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी व शिक्षणाविषयी गोडी निर्माण होईल, त्यांचा शाळेतील पहिला दिवस आनंददायी होईल आणि शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे आणि शिक्षणाधिकारी अशोक कडुस यांनी व्यक्त केला आहे.

# धरणांतील पाणी पिण्यासाठी राखीव; शेतीचे आवर्तने होणार बंद

## पाणी उपसा थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार यावर्षी एल निनो परिस्थितीचा प्रभाव राहण्याची शक्यता असून, पर्जन्यमानात घट होण्याची शक्यताही वर्तविली आहे. यासर्व पार्श्वभूमीवर राज्यातील विविध धरणं, जलाशय आणि जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा संरक्षित करुन, सुरु असलेली पाण्याची आवर्तन तात्काळ बंद करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डौले यांनी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिका-यांना दिले आहेत.

या संदर्भात शासनाने काढलेल्या परिपत्रकात सर्व जिल्हाधिकारी व संबधित जलसंपदा विभागाच्या आधिका-यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील धरणं व जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा. अत्यावश्यक परिस्थिती वगळता पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पाण्याचा वापर इतर कोणत्याही कारणांसाठी करु नये. ३१ ऑगस्ट पर्यंत सर्व शहरी व ग्रामीण भागात अखंडीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल यासाठी धरणांमध्ये आरक्षित करण्यात आलेला पाणीसाठा जपून वापरण्याबाबतही जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना प्रधान सचिवांनी दिल्या आहेत.

**पाणी उपसा थांबविण्यासाठी विशेष मोहीम**

स्थानिक स्वराज्य संस्था, पाणी पुरवठा विभाग यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून परिस्थितीचा नियमित आढावा घेण्याबाबत तसेच धरणं, कालवे, नद्या, तलाव व इतर जलस्रोतांमधून होणारा अनाधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तात्काळ थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देशही शासनाने काढलेल्या परिपत्रात देण्यात आले आहेत. यासाठी महसूल, पोलिस व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकांमार्फत अनधिकृत मोटारी, पाइपलाइन,पंप व इतर सामुग्रीची तपासणी करण्याकरिता गस्त आयोजित करावी व वेळप्रसंगी दि.१२ डिसेंबर २०१८ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कारवाईच्या कडक सूचना ही शासनाने परिपत्रकात दिल्या आहेत.

**प्रत्येक आठवड्याला अहवाल सादर करण्याच्या सूचना**

पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सिंचन आवर्तने स्थगित करण्याबाबतची कार्यवाही व बेकायदेशीर पाणी उपसा रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्रत्येक आठवड्याला सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, सर्व पाटबंधारे विकास महामंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

# अन्न व औषध प्रशासन आयुक्त मुंढे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक

## अहिल्यानगरमधील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दूध भेसळीच्या विरोधात सुरू केलेल्या मोहिमेचे स्वागत करण्यासाठी खडकी (ता.अहिल्यानगर) येथील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी मुंडे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक केला. यावेळी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त पदावरून किमान ३ वर्षे बदली होऊ नये अशी मागणी करण्यात आली. त्यासाठी घोषणाबाजी करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दूध भेसळीच्या विरोधात मोहीम सुरू केल्याने बाजारातील कृत्रिम व भेसळीचे दूध कमी होऊ लागले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडील दूध बाजारात येऊ लागले आहे. त्याला योग्य मोबदला मिळण्यास त्याचा उपयोग होणार आहे. नागरिकांनाही चांगल्या प्रकारचे नैसर्गिक दूध उपलब्ध होईल, असे खडकी येथील दूध उत्पादक नंदू रोकडे यांनी सांगितले.

अधिक माहिती देताना राहुल बहिरट यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांचा आर्थिक कणा समजला जातो. या व्यवसायात भेसळखोरांमुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. परंतु अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे मुंडे यांनी घेतल्यानंतर त्यांनी दूध भेसळीच्या विरोधात सुरू केलेल्या धडक मोहीमेमुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांना संजीवनी मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या घामाला दाम मिळेल. नैसर्गिक दूध उत्पादनास योग्य दर मिळेल. या अपेक्षेने शेतकरी सध्या आयुक्त मुंढे यांच्याकडे पहात आहेत.

दरम्यान, अहिल्यानगर शहरातील विविध स्वयंसेवी संस्थांनी तुकाराम मुंढे यांच्या धडक मोहीमचे स्वागत करत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुकाराम मुंढे यांची आयुक्त पदावरून बदली करू नये, अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

# जागतिक रक्तदान दिनानिमित्त भाजपच्या रक्तदान शिबिरात १५३ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** शासकीय रक्तपेढीत निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा लक्षात घेता आमदार किशोर जोरगेवार यांच्या सूचनेनुसार भारतीय जनता पक्षाच्या वतीने जागतिक रक्तदान दिनानिमित्त रविवार, दिनांक १४ जून २०२६ रोजी भाजप महानगर कार्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून तब्बल १५३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.



यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते सर्व रक्तदात्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी भारतीय जनता पक्षाचे माजी महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहिर, महामंत्री रविंद्र गुरनुले, मनपा गटनेते शेखर शेट्टी, प्रकाश देवतळे, तुषार सोम, दशरथसिंह ठाकूर, अजय जयस्वाल, सुभाष अदमाने, स्वप्नील डुकरे, प्रदीप किरमे, राकेश नाकाडे, सायली तोंडरे, कौसर खान, नगरसेविका आशा देशमुख, नगरसेवक भालचंद्र दानव, विमल कातकर, करणसिंह बैस, राशिद हुसेन, कार्तिक बोरेवार, निशिकांत महागावकर, तेजा सिंग, रज्जत ठाकूर, राकेश बोमनवार, अनिता झाडे, अस्मिता दोनाडकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.किशोर जोरगेवार म्हणाले की, रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याला नवजीवन देण्याचे पवित्र कार्य आहे. अपघातग्रस्त, गंभीर आजारांनी पीडित रुग्ण, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण तसेच थॅलेसेमियाग्रस्त बालकांसाठी रक्ताची नितांत गरज असते. अशा वेळी रक्तदात्यांनी दिलेला प्रत्येक रक्ताचा थेंब एखाद्याचा जीव वाचवण्यासाठी मोलाचा ठरतो.

ते पुढे म्हणाले की, शासकीय रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा असल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने रक्तदान शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून मोठ्या संख्येने युवक, कार्यकर्ते आणि नागरिकांनी रक्तदानासाठी पुढाकार घेतला, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. समाजहितासाठी अशा उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होणे हीच खरी मानवसेवा आहे.

रक्तदानामुळे कोणतीही शारीरिक हानी होत नाही. उलट रक्तदानामुळे आरोग्य तपासणी होते आणि सामाजिक कर्तव्य पार पाडल्याचे समाधान मिळते. त्यामुळे प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदान करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच वैद्यकीय पथकाने विशेष परिश्रम घेतले. यावेळी तब्बल ६३ वेळा रक्तदान करणारे अतुल हेमके यांचा आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे आणि रक्तदान क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचे यावेळी कौतुक करण्यात आले.

# नालेसफाईचा गाळ रस्त्यावरच; नगरसेविका वेदिका पाटील यांच्या तत्परतेने मार्ग मोकळा



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, दिवा (ठाणे) :** दिव्यातील बिहार नगर, टाटा पॉवर जवळील नाल्याची सफाई केल्यानंतर काढलेला गाळ आणि कचरा रस्त्यावरच तसाच सोडून दिल्याने नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत होता. शिवाय येण्या-जाण्याचा रस्ताच बंद झाल्याने नागरिक हैराण झाले होते. अखेर नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांच्या तत्परतेमुळे हा गाळ उचलण्यात आला असून रस्ता मोकळा झाला आहे.

**काय होता प्रकार?**

टाटा पॉवर जवळील नाल्याची ठाणे महापालिकेकडून सफाई करण्यात आली. मात्र, नाल्यातील गाळ आणि कचरा काढून थेट रस्त्याच्या कडेलाच टाकण्यात आला. त्यामुळे रस्ता पूर्णपणे अडला. खूप घाण वास येतोय. लोकांना येण्या-जाण्यासाठी रस्ताच उरला नाही, अशी तक्रार स्थानिक नागरिकांनी केली.

**नगरसेविकेची तातडीने कृती :**

नागरिकांची गैरसोय लक्षात येताच स्थानिकांनी नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांच्याशी संपर्क साधला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वेदिका पाटील यांनी ताबडतोब ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले. त्यानंतर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर पडलेला गाळ आणि कचरा तातडीने उचलला.

**नागरिकांना दिलासा :**

नगरसेविकेच्या या तत्परतेमुळे बिहार नगर टाटा पॉवर जवळील रस्ता आता नागरिकांसाठी मोकळा झाला आहे. दुर्गंधीपासूनही नागरिकांची सुटका झाली आहे. वेळेत दखल घेतल्याबद्दल नगरसेविका वेदिका पाटील यांचे आभार, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

पावसाळ्यापूर्वी नालेसफाई करणे गरजेचे आहे. मात्र, सफाईनंतर निघणारा गाळ तातडीने उचलणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे या घटनेवरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

